# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २५२ - २३ दिनांक : - ०७/०८/२०२३

## १०,४०,०००/- रुपये किंमतीचा ५२ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन (एम डी) हा अंमली पदार्थ जप्त - मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी.

मिरा - भाईंदर, वसई – विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मीरारोड भाईंदर परिसरात अंमली पदार्थ खरेदी विक्री करणा-या इसमां विरुध्द माहिती प्राप्त करुन कारवाई करण्याताबाबत वरिष्ठांनी सूचना व मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने दिनांक ०५/०८/२०२३ रोजी मध्यवर्ती गुन्हे शाखेतील प्रभारी पोलीस निरीक्षक श्री राहुल राख, सपोनि दत्ताञय सरक व पथक हे मिरा भाईंदर परिसरात गस्त करीत असताना गावदेवी चाळी समोर, गावदेवी चौका जवळ, गावदेवी मंदीर रोड, नवघर गाव, भाईंदर पुर्व, ता. जि. ठाणे या ठिकाणी आले असता रस्तावर एक इसम हा संशयास्पद स्थितीत उभा असल्याचे दिसले. त्याचे हालचालीवर संशय बळाविल्याने सापळा रचुन पोलीस पथकाने त्यास शिताफीने ताब्यात घेवून त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव अंकित भरत जाधव, वय २१ वर्षे, राह. नवघर गाव, भाईंदर पुर्व, ता.जि.ठाणे असे सांगितले. सदर इसमाच्या कब्जात ५२ ग्रॅम वजानाचा १०,४०,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम डी) हा अंमल पदार्थ विक्री करीता बाळगला असल्याची खाञी झाल्याने,सदर अंमली पदार्थ पुढील कारवाई कामी जप्त करण्यात आला असुन, वर नमुद आरोपी विरुध्द पोलीस हवालदार जयकुमार राठोड यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४९६/२०२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२(क) अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश आंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोनि.राहुल राख, स.पो.नि.दत्तात्रय सरक, स.फौ. श्रीमंत जेधे, पो.हवा. सतिश जगताप, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, अनिल नागरे, जयकुमार राठोड, हनुमंत सुर्यवंशी, मसुब जवान सचिन चौधरी यांनी केलेली आहे.

----ooo-----